# रे.दि.मु.क्र. ८६/२०१४ मधील नि.क्र. ४५ वरील आदेश

वाटप आणि पृथक कब्जाचे दाव्यात प्रतिवादी क्र. १, ५ तर्फे प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ अन्वये वादअर्ज फेटाळण्यासाठी दाखल केला. वादीतर्फे नि.क्र.४७ लगत म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला. युक्तीवाद ऐकले.

२) अर्जदार प्रतिवादीचे कथन थोडक्यात असे की, वादींनी दावा मिळकत विकली आहे. तसे नि.क्र.५ खालील आदेशात देखील नमूद केले आहे. त्यामूळे वादीकडे वाटपपात्र मिळकती नाहीत. वादीनी आवश्यक ते न्यायालयीन शूल्क भरले नाही. युक्तीवादादरम्यान सुविद्य विधीज्ञ श्री.जाधव म्हणतात की, दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ अन्वये कलम १५१ चा वापर करावा.

३) वादी त्यांच्या म्हणण्यामध्ये सांगतात की, तथाकथीत खरेदीपत्र बोगस आणि मूलतः बेकायदेशीर आहे. तथाकथीत खरेदीपत्राने वादीची मालकी गेली नाही. अभिलेख सदरी वादीचीच नावे आहेत.

४) प्रतिवादी अर्जदारांतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.एस.बी.जाधव आणि वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.आर.एच.भोसले यांचे विस्तृत युक्तीवाद ऐकले. खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्याचे सकारण निष्कर्ष खाली नमूद करतो.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | अर्जात नमूद कारणासाठी वादअर्ज फेटाळणे न्यायीक आहे का ? | नाही |
| (२) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५) **मुद्दा क्र. १ :—**

वाद अर्ज फेटाळण्याचा मुद्दा ठरविताना केवळ वादअर्जातील कथने विचारात घ्यावीत असे कायद्याचे तत्व आहे. वादअर्जानूसार दावा मिळकत विक्री केल्याबाबत कथन नाही. त्यामूळे याक्षणी वादअर्ज फेटाळणे न्यायीक नाही. दाव्यास आवश्यक पक्षकारांच्या अभावी किंवा वाटपास पात्र मिळकती नाहीत या कारणास्तव फारतर दावा फेटाळता येईल पण ते पुराव्याअंती ठरेल. हेच तत्व अर्जदारातर्फे दाखल

***"Kamala & Ors. Vs. K.T.Eshwara Sa & Ors., AIR 2008 Supreme Court 3174"*** या निवाडयात विषद केले आहे (परिच्छेद क्र. २५). निवाडयातील प्रकरणात देखील वादींकडे दावा मिळकती उपलब्ध नाहीत अशी हरकत घेतली होती. त्याबाबत ना. सर्वोच्च न्यायालयाने विषद केले,

> *"Whether the properties mentioned in the plaint are available for partition is essentially a question of fact".*

प्रामुख्याने प्रतिवादीनी सांगितलेले खरेदीपत्र सदरकामी वादीनी नाकारले आहे. अभिलेखसदरी वादीच्या नोंदी आहेत. त्यामूळे त्या खरेदीपत्राबाबत पुरावा आणि चौकशी घेतल्याशिवाय याक्षणी कोणताही मतीतार्थ नोंदविणे न्याय्य नाही.

६) प्रतिवादी अर्जदार म्हणतात की, वादीनी न्यायालयाची फसवणूक केली. म्हणून दावा तत्काळ फेटाळावा. याबाबत त्यांनी ***"S.P.Chengalvaraya Naidu Vs. Jagannath & Ors., AIR 1994 Supreme Court 853"*** या निवाडयावर भिस्त ठेवली. सदर निवाडयातील प्रकरण हे अंतिम हुकूमनामा प्रकरणाशी निगडीत आहे. वादीनी मुळ मालकाचे पश्चात हक्कसोड केले होते. मूळ प्रकरणात ही बाब लपवून ठेवली. अंतिम हूकूमनामा प्रकरणात प्रतिवादींनी ती न्यायालयाचे निदर्शनास आणून दिली. परंतू क्रमशः ना. सर्वोच्च न्यायालयानी विषद केले की, वादीनी फसवणूक करुन प्राथमिक हुकूमनामा मिळविला. अन्वये अंतिम हुकूमनामा प्रकरण फेटाळले. अशा बाबी येथे नाहीत. न्यायालयाने नि.क्र.५ खालील आदेशावेळी सकृतदर्शनी विषद केले की, वादीनी सदर महत्वाची बाब लपवून ठेवली. परंतू त्यामधील निष्कर्ष सकृतदर्शनी आहेत. वादीनी त्या खरेदीपत्राबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही केल्याचे सांगितले नाही. परंतु त्या बाबी दाव्याच्या चौकशीदरम्यान, पक्षकारांना पुराव्याची संधी देवून ठरवाव्या लागतील. सबब प्रस्तुत निवाडा प्रतिवादींना उपयुक्त नाही. त्यामूळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ देखील याक्षणी अंमलात येणार नाही.

७) दाव्याच्या मुल्यांकनाबाबत दावा वाटपाचा आहे. शेतमिळकत आहे. त्यामूळे मुंबई न्यायालयीन शुल्क अधिनियमाचे कलम ६(५) अन्वये शेतसाऱ्याच्या २००

पट रक्कम इतकेच मूल्यांकन होईल. खरेदीपत्र हे रु. १,३०,०००/— चे आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. पण त्याबाबत वादींनी कोणतीही दाद मागितली नाही. सबब प्रस्तुत हरकत योग्य नाही.

८) एकंदर उपस्थित हरकती या वादअर्ज फेटाळण्यासाठी पुरेशा नाहीत. फारतर प्रतिवादी त्यांचे म्हणणे शाबीत करु शकले तर नक्कीच दाव्याच्या अंतिम निकालावेळी त्याचा सुयोग्य विचार होईल. म्हणुन मुद्दा क्र. १ मी नकारार्थी ठरवितो.

**मुद्दा क्र. २ :—**

९) उपरोक्त पार्श्वभूमीवर अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. तथापी वादी, प्रतिवादी क्र. ६ आणि प्रतिवादी क्र. ७ यांचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. सबब ते ज्येष्ठ नागरीक असल्याने दाव्याची सुनावणी अग्रक्रमाने होणे क्रमप्राप्त आहे. सबब आदेश.

## आदेश

(१) अर्ज नामंजूर केला.

(२) खर्चाबाबत अंतिम निकालावेळी ठरेल.

(३) दावा अग्रक्रमाने चालविणेबाबत नि.क्र. १ खाली आदेश पारीत केला.

दिनांक — २१/०१/२०१७
महाबळेश्वर

(प्र.अ.कुंभोजकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महाबळेश्वर